## थोडक्यात...

## ग्रामीण रुग्णालयात महात्मा फुले यांची जयंती साजरी



(बाळासाहेब ढेरे/दै.धर्मयोध्दा)

**सोनपेठ** -तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात महात्मा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिष्ठाता डॉ.व्ही.एस.कराड,वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ.सिद्धेश्वर हालगे,वैद्यकीय अधिकारी डॉ.भारत चव्हाण ,सुंदर वाघमारे,आलिम शेख,मालपाणी,वैशाली गाडे,श्रीमती लोंढे, डॉ.मन्मथ महाजन, राजाभाऊ दातार यांच्यासह व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय येथे महात्मा ज्योतिबा फुले जयंती साजरी



**पालम**- तालुक्यातील चाटोरी येथील स्वामी विवेकानंद विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करू अभिवादन करण्यात आले. प्रसंगी अरुणोदय संस्थेचे अध्यक्ष प्रा. संदीप किरडे, सचिव सचिन जोशी , कोषाध्यक्ष सुभाष ढगे , प्राचार्य डि. बी. पवार यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक व कर्मचारी आदी उपस्थित होते.

## सामाजिक समता सप्ताहानिमित्त पथनाट्य सादर

**परभणी**- महानगरपालिका व महाराष्ट्र स्कूल ऑफ ड्रामा यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीवर्षानिमित्त तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सामाजिक समता सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरात तसेच क्रांतिसुर्य महात्मा ज्यातीराव फुले आणी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारक परिसरात पथनाट्य सादर करण्यात आले. या पथनाट्यास मनपाच्या सांस्कृतिक विभागाचे सहायक आयुक्त गजानन जाधव, सांस्कृतिक विभागप्रमुख राजकुमार जाधव उपस्थित होते. पथनाट्यात महाराष्ट्र स्कूल ऑफ ड्रामाचे प्रकाश बरबिंड, मनीषा उमरीकर, संदीप राठोड, मनीषा गोरे, वर्षा जोशी, प्रवीण इंगोले, शुभांगी कुलकर्णी, चिन्मय भाले आणि देवा लांडगे आदी कलावंतांनी सहभाग घेतला. या कलाकारांनी महापुरुषांच्या विचारांवर आधारित सामाजिक संदेश देणारे पथनाट्य सादर करून प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. पथनाट्याच्या माध्यमातून समता, बंधुता आणि सामाजिक जागृतीचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

# “अहमदपूरची चिमुकली राज्यात अव्वल; कनीष्काचा बुद्धिमत्तेचा झंकार!”

(मनोज पाटील/दै.धर्मयोध्दा)

**अहमदपुरी** - लातूर जिल्ह्यातील अहमदपूर शहराने शिक्षण क्षेत्रात पुन्हा एकदा आपली चमक दाखवत अभिमानाची नोंद केली आहे. अक्षरगंगा प्रज्ञाशोध परीक्षा २०२६ मध्ये येथील विमलाबाई देशमुख कन्या प्राथमिक शाळेची विद्यार्थिनी कनीष्का किरण बेंबडे हिने राज्यात पाचवा क्रमांक जिल्ह्यातील पहिली पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिच्या या यशामुळे शाळेसह संपूर्ण शहराचा मान उंचावला आहे. इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित या स्पर्धात्मक परीक्षेत कनीष्काने १५० पैकी तब्बल १४२ गुण मिळवत आपली असामान्य बुद्धिमत्ता आणि अभ्यासातील सातत्य सिद्ध केले आहे. एवढ्या लहान वयात मिळवलेले हे यश तिच्या जिद्दीचे, चिकाटीचे आणि मेहनतीचे द्योतक ठरले आहे.



या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा सीमाताई देशमुख व सचिव पी. डी. कदम यांनी कनीष्काचे भरभरून कौतुक केले. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शोभा राजपंगे यांनीही तिच्या या उल्लेखनीय कामगिरीचे अभिनंदन करत तिच्या उज्ज्वल भवितव्याचा विश्वास व्यक्त केला. तसेच, कनीष्काला मार्गदर्शन करणाऱ्या वर्गशिक्षिका श्रीमती वनिता मुंडकर मॅडम यांच्या योग्य मार्गदर्शनामुळेच हे यश शक्य झाल्याचे विशेषतः नमूद करण्यात आले.शाळेतील सर्व शिक्षकांनी कर्मचारी या यशाबद्दल अभिनंदन केले कनीष्काच्या या उज्ज्वल कामगिरीमुळे विमलाबाई देशमुख कन्या शाळेचा शैक्षणिक दर्जा अधिक दृढ झाला असून, इतर विद्यार्थ्यांसाठी ती प्रेरणादायी ठरली आहे. अहमदपूर शहरात सर्व स्तरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. “लहान वयात मोठी स्वप्ने पाहून ती साकार करणाऱ्या कनीष्काने खऱ्या अर्थाने यशाचा नवा आदर्श निर्माण केला आहे.”

## दीडशे वर्षांची परंपरा जपणारी पाडळी; ‘आईचं सोंग’ यात्रेत श्रद्धा आणि उत्साहाचा संगम

(नवनाथ गव्हाणे/ दै.धर्मयोध्दा)

**बदनापुर**- तालुक्यातील पाडळी गावात गेल्या दीडशे वर्षांपासून चालत आलेली आईच्या यात्रेची परंपरा आजही तितक्याच श्रद्धा, उत्साह आणि निष्ठेने साजरी होत आहे. आधुनिकतेच्या झपाट्याने बदलणाऱ्या काळातही या गावाने आपली पारंपरिक ओळख जपली असून, “आईचं सोंग” घेण्याची अनोखी प्रथा ही या यात्रेची मुख्य आकर्षण ठरते. या यात्रेनिमित्त गावातील लहानांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वजण आईचे रूप धारण करून कार्यक्रमात सहभागी होतात. रंगीबेरंगी वेशभूषा, पारंपरिक अलंकार आणि भक्तिभावाने भारलेले वातावरण यामुळे संपूर्ण गावात एक वेगळाच उत्सव साकारतो. विशेष म्हणजे, ही परंपरा केवळ धार्मिक श्रद्धेपुरती मर्यादित न राहता सामाजिक एकात्मतेचेही दर्शन घडवते. गावातील वयोवृद्धांच्या मते, ही परंपरा पिढ्यान् पिढ्या चालत आली असून, त्यामागे श्रद्धा आणि गावाच्या संरक्षणाची भावना दडलेली आहे. आईच्या कृपेने गावात सुख-समृद्धी नांदावी, या विश्वासाने ही यात्रा साजरी केली जाते. आजच्या डिजिटल युगात अनेक पारंपरिक रूढी लोप पावत असताना, पाडळी गावाने मात्र आपली सांस्कृतिक परंपरा जिवंत ठेवली आहे. खेड्यापाड्यात अजूनही अशा परंपरा टिकून असल्याचे हे एक ज्वलंत उदाहरण आहे. ही यात्रा केवळ धार्मिक विधी नसून, गावाच्या एकात्मतेचा, संस्कृतीचा आणि परंपरेचा जिवंत वारसा आहे. पाडळी गावाने जपलेली ही परंपरा इतरांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

## परभणी जिल्ह्याचे पालक मंत्री मेघनादिदि यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर,व वृक्षारोपण



(संतोष तायडे/ दै.धर्मयोध्दा)

**बोरी**- येथील विविध सामाजिक उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले. भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते ओमकार चौधरी व शेख वसीम यशवंत काका चौधरी सतीश भाऊ चौधरी दिनकरराव चौधरी कनकुटे राठोड संगेकर देशमुख यांच्या पुढाकारातून माजी मंत्री मेघनादिदे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर, वृक्षारोपण तसेच कार्यक्रम आयोजित करण्यात आले

## रिपब्लिकन सेनेच्या हिंगोली (लोकसभा क्षेत्र प्रमुख) जिल्हाध्यक्षपदी राजु इंगोले तर महासचिवपदी सिद्धांत गायकवाड ; प्रदेशाध्यक्ष डॉ. सुशिलकुमार सुर्यवंशी यांची घोषणा

(महेंद्र पुरी/दै.धर्मयोध्दा)

**हिंगोली** - येथील शासकीय विश्रामगृहात आज दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी प्रदेशाध्यक्ष डॉ. सुशीलकुमार सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत रिपब्लिकन सेनेच्या हिंगोली जिल्हाध्यक्षपदी राजू इंगोले तर महासचिवपदी सिद्धांत गायकवाड यांची निवड करण्यात आली. याच बैठकीत युवा जिल्हाध्यक्षपदी राहुल करवंदे यांची सुद्धा निवड करण्यात आली. रिपब्लिकन सेनेचे संस्थापक प्रमुख आनंदराज आंबेडकर यांच्या आदेशानुसार महाराष्ट्रभर नवीन जिल्हा कार्यकारणी गठित करण्याचे काम चालू आहे. त्यानुसार हिंगोली येथे ही बैठक घेण्यात आली. यावेळी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष डॉ. सुशिलकुमार सुर्यवंशी यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना संघटना अधिक मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. या बैठकीस युवा प्रदेशाध्यक्ष किरण घोंगडे, लिगल सेलचे महाराष्ट्र नेते ॲड. रावन धाबे, जिल्हा संघटक गोरख खिल्लारे, आकाश दातार,जिल्हा संघटक सर्जेराव खंदारे, प्राध्यापक बाळासाहेब पाईकराव, सय्यद मुनीर भाई, पंडित सुर्यतळ,भारत गडधने,करण



फुंदसे, निलेश रणखांबे,राजु उबाळे, आकाश कांबळे,भारत वाकळे,राजु सरतापे गौतम सरतापे, श्रावण सरतापे,सह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुत्रसंचलन प्राध्यापक बाळासाहेब पाईकराव यांनी केले तर आभार कामाजी खिल्लारे यांनी मानले.

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून, त्यांच्या निवडीमुळे जिल्ह्यात संघटनेला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

हिंगोली: येथील शासकीय विश्रामगृहात आज दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी प्रदेशाध्यक्ष डॉ. सुशीलकुमार सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत रिपब्लिकन सेनेच्या हिंगोली जिल्हाध्यक्षपदी राजू इंगोले तर महासचिवपदी सिद्धांत गायकवाड यांची निवड करण्यात आली. याच बैठकीत युवा जिल्हाध्यक्षपदी राहुल करवंदे यांची सुद्धा निवड करण्यात आली. रिपब्लिकन सेनेचे संस्थापक प्रमुख आनंदराज आंबेडकर यांच्या आदेशानुसार महाराष्ट्रभर नवीन जिल्हा कार्यकारणी गठित करण्याचे काम चालू आहे. त्यानुसार हिंगोली येथे ही बैठक घेण्यात आली. यावेळी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष डॉ. सुशिलकुमार सुर्यवंशी यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना संघटना अधिक मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. या बैठकीस युवा प्रदेशाध्यक्ष किरण घोंगडे, लिगल सेलचे महाराष्ट्र नेते ॲड. रावन धाबे, जिल्हा संघटक गोरख खिल्लारे, आकाश दातार,जिल्हा संघटक सर्जेराव खंदारे, सय्यद मुनीर भाई, पंडित सुर्यतळ,भारत गडधने,करण फुंदसे, निलेश रणखांबे,राजु उबाळे, आकाश कांबळे,भारत वाकळे,राजु सरतापे गौतम सरतापे, श्रावण सरतापे,सह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुत्रसंचलन प्राध्यापक बाळासाहेब पाईकराव यांनी केले तर आभार कामाजी खिल्लारे यांनी मानले.

## पूर्णेत वाळूमाफियात सिनेस्टाईल हाणामारी शहरात दहशतीचे वातावरण, तिघे गंभीर जखमी

**परभणी** - शहरांमध्ये जुन्या वादातून बंदूकीचा धाक दाखवून धारदार शस्त्र, लाठ्याकाठ्याने तीन जणांना बेदम मारहाण केल्याची घटना शुक्रवारी(दि. ११) रात्री ९ वाजण्याच्या सुमारास झिरोफाटा रोडवरील एका धाब्यासमोर घडली. मारहाण करणारे घटनास्थळावरून प्रसार झाले आहेत. घटनेतील जखमींवर उपचार सुरू असून या प्रकरणी पूर्णा पोलिसांत शस्त्र अधिनियमानूसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, पूर्णा येथील मराठागल्ली भागात राहणारे कौस्तुभ कालिदास कदम (वय २७) शुक्रवारी आपल्या दोन भावंडांसोबत जेवण्यासाठी झिरोफाटा रस्त्यावरील एका धाब्यावर गेले होते. दरम्यान रात्री नऊ वाजता वाहनातून आलेल्या पाच - सहा जणांनी कौस्तूभ कदम व त्याच्यासोबत असलेल्यांना घेरले. त्यांनी बंदुकीचा धाक दाखवून हातात असलेल्या धारदार शस्त्राने, लाठी-काठीने बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच पोलीसांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. मात्र तोपर्यंत मारेकरी प्रसार झाले. दरम्यान, फिर्यादी कौस्तूभ कदम व त्याचे भाऊ यांना गंभीर जखम झाल्याने त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. येथील रुग्णालयात प्राथमिक उपचार करून त्यांना पुढील उपचारासाठी परभणी येथे पाठविण्यात आले असल्याचे समजते. ही घटना ही वाळू उपसाच्या ठिकाणावर जुन्या वादातून घडल्याचे पुढे येत आहे. फिर्यादी कौस्तुभ कदम यांनी प्रकरणी पूर्णा पोलिसात पाच ते सहा जणाविरुद्ध गुरंनं १४८/२०२६ कलम १०९, ११८(२), (१), १८९(२), (३), (४), १९० भारतीय न्याय संहिता कलम ३, २५ शस्त्र अधिनियम कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास फौजदार श्रीनिवास पडलवार हे करीत आहेत.

यात एका गोपनीय शाखेच्या पोलीस कर्मचाऱ्यांना मारहाण, वाळुउपशा विरोधात तक्रार देणाऱ्या शहरातील एका तरुणाचे अपहरण करून मारहाण तसेच धाब्यावर जेवण्यासाठी गेलेल्या तीन भावंडांना झालेली मारहाण ह्या घटना चिंतेची बाब असल्याचे बोलले जात आहे. वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळे सर्वसामान्य जनतेत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## सोनपेठ शहरात एच.पी.व्ही. लसीकरण मोहिमेला प्रतिसाद; विद्यार्थिनी व पालकांमध्ये जनजागृती

(सिध्देश्वर गिरी/ दै.धर्मयोध्दा)

**सोनपेठ** - ग्रामीण रुग्णालय सोनपेठ यांच्या वतीने एच.पी.व्ही. लसीकरण मोहिमेअंतर्गत शहरात व्यापक जनजागृती करण्यात आली. दि. ०८/०४/२०२६ व दि. ११/०४/२०२६ रोजी आयोजित या मोहिमेत जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, मुक्तेश्वर विद्यालय तसेच इतर शाळांमध्ये जाऊन विद्यार्थिनींना लसीकरणाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. या वेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. व्ही.एस.कराड यांनी सांगितले की,भारतात महिलांमध्ये आढळणाऱ्या गर्भाशयमुख





(सर्व्हायकल) कर्करोगाचे प्रमाण ४० वर्षानंतर सुमारे ५ ते १० टक्के आहे.या आजाराचे प्रमुख कारण एच.पी.व्ही. विषाणू असून,त्यावर प्रतिबंध म्हणून ही लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या वतीने महिलांमधील कर्करोग रोखण्यासाठी ही मोहीम ८ मार्च २०२६ पासून (जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने) सुरू करण्यात आली आहे. या लसीकरणासाठी १४ ते १५ वयोगटातील सर्व मुली पात्र असून,ज्यांनी यापूर्वी एच.पी. व्ही. लस घेतलेली नाही अशा विद्यार्थिनींनी ही लस घेणे आवश्यक आहे.लस जेवणानंतर घ्यावी व लसीकरणानंतर १० मिनिटे आरोग्य केंद्रात थांबण्याचा सल्ला देण्यात आला.या लसीमुळे कोणतेही विपरीत परिणाम होत नसल्याचेही डॉक्टरांनी स्पष्ट केले. ग्रामीण रुग्णालय सोनपेठ हे नव्याने निर्माण झालेले ठिकाण असल्याने व शीतसाखळी सुविधा उपलब्ध नसल्यामुळे शहरातील सर्व पात्र लाभार्थ्यांसाठी तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र शेळगाव येथे लसीकरणाची सोय करण्यात आली आहे. तसेच विद्यार्थिनींसाठी मोफत वाहन व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. या मोहिमेस शिक्षक, पालक व विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.कार्यक्रमात वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. सिद्धेश्वर हालगे, वैद्यकीय अधिकारी डॉ.भारत चव्हाण, सुंदर वाघमारे, आलिम शेख, मालपाणी, वैशाली गाडे, श्रीमती लोंढे, डॉ.मन्मथ महाजन, राजाभाऊ दातार यांच्यासह शिक्षक, पालक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मानवत पोलीस स्टेशनमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शांतता समितीची बैठक संपन्न

(दशरथ शिंदे/ दै.धर्मयोध्दा)

**मानवत**- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मानवत पोलीस स्टेशन येथे शांतता समितीची बैठक उत्साहात व खेळीमेळीच्या वातावरणात दिनांक ११ सायंकाळी ६ वाजेच्या दरमन पार पडली. या बैठकीस प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी दीपक कुमार वाघमारे हे उपस्थित होते. सुरुवातीला प्रमुख पाहुणे उपविभागीय पोलीस अधिकारी दीपक कुमार वाघमारे यांचे स्वागत मानवत पोलीस स्टेशनचे प्रभारी संदीप बोरकर यांनी केले





यावेळी पोलीस उपनिरीक्षक दिगंबर पाटील, पीएसआय घोरपडे, नगरपालिकेचे स्वच्छता निरीक्षक मुंजाभाऊ गवारे, राजूभाऊ खरात, जनार्दन कीर्तने, हबीब भडके, नियमात खान, संपत पंडित जनार्दन कीर्तने यांच्यासह सर्व गावांचे पोलीस पाटील, भीम जयंती मंडळांचे पदाधिकारी, तसेच मानवत शहर व ग्रामीण भागातील युवक,पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शांतता कमिटीच्या बैठकीचे बैठक सूत्रसंचालन सदाशिव होगे सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन पोलीस उपनिरीक्षक दिगंबर पाटील यांनी केले. बैठकीत राजूभाऊ खरात, जनार्दन कीर्तने व संपत पंडित आनंद मामा भदर्गे यांनी संयुक्तरित्या जयंती कोणत्याही गालबोटाशिवाय शांततेत पार पाडण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच “शांतता भंग करणाऱ्यांना आम्ही स्वतः पोलिसांच्या स्वाधीन करू,” असे ठाम वक्तव्य त्यांनी केले. प्रमुख पाहुणे दीपक कुमार वाघमारे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, यावर्षीही डीजेला परवानगी नसून सर्वांनी कायद्याचे पालन करून जयंती शांततेत आणि शिस्तीत साजरी करावी. ही बैठक सर्व जाती-धर्मातील नागरिकांच्या उपस्थितीत पार पडून सामाजिक सलोखा व एकतेचा संदेश देणारी ठरली.

## श्री शिवाजी विधी महाविद्यालयात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती साजरी

(सिध्देश्वर गिरी/ दै.धर्मयोध्दा)

**परभणी** - म.शि.प्र.मंडळ संचलित श्री शिवाजी विधी महाविद्यालय परभणी येथे शनिवार ११ एप्रिल २०२६ रोजी भारतातील स्त्री शिक्षणाचे जनक आणि थोर समाज सुधारक क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची १९९ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.एल.धर्मापुरीकर आणि महाविद्यालय विकास समितीचे



स्थानिक सदस्य श्री.संतोषजी बोबडे यांनी प्रतिमेचे पूजन करून उपस्थितांना जयंती निमित्त शुभेछ्या दिल्या. सदर जयंतीचे आयोजन हे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत करण्यात आलेले होते यावेळी रा.से.यो. विभागाचे प्रमुख डॉ.आर.बी.देशमुख तसेच प्रा.डॉ.पी.जी.चव्हाण,प्रा.डॉ. व्ही.पी. माकणीकर,प्रा.डॉ ग्यानेंद्र फुलझळके, प्रा.अनिता बागल, प्रा. मयुरी शिरसाठ, प्रा.शाम सुक्रे,प्रा.परमेश्वर वांगकर तसेच प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.आ.श्री. प्रकाश दादा सोळंके, सचिव मा. आ. श्री. सतीश भाऊ चव्हाण तसेच महाविद्यालय विकास समितीचे सन्माननीय सदस्य मा.श्री. चंद्रशेखर नखाते, मा. श्री. गोविंद कदम, मा. श्री.मगदूम मोहीउद्दीन, मा. श्री. संतोष बोबडे, मा. ॲड. दीपक देशमुख, मा. ॲड. अशोक शिंदे, मा. श्री. संतोष इंगळे आदींनी जयंती निमित्त शुभेच्छा दिल्या

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao